# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 16.09.2026** **वार : बुधवार**

---

## ठळक बातम्या

1. दोन हजार रुपयांपर्यंतच्या यूपीआय व्यवहारांवर तसंच रुपेडेबिट कार्डावरील व्यवहारांवर शुल्क आकारणी केली जाणार नाही; केंद्रीय अर्थमंत्रालयाकडून स्पष्ट.
2. भारत आणि चीन यांच्यातील चिंतेच्या मुद्द्यांवर तोडगा काढताना परस्पर आदर, हित आणि संवेदनशीलता' हे मार्गदर्शक तत्व असावं; पंतप्रधानांची अपेक्षा.
3. महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यातल्या दिघी इथं देशातील सर्वात मोठं जहाजबांधणी केंद्र उभारण्यात येणार.
4. नेपाळमधील पुरात मरण पावलेल्यांची संख्या 1 हजार 399 वर.
5. अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-20 क्रिकेट मालिकेतील दूसरा सामना जिंकून भारताची विजयी आघाडी.

## सविस्तर बातम्या

### युपीआय

'युपीआय'द्वारे दोन व्यक्तींमध्ये हस्तांतरित केल्या जाणाऱ्या कोणत्याही रकमेच्या व्यवहारांवर कुठलंही शुल्क आकारलं जाणार नाही,असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. याशिवाय व्यक्ती आणि व्यापारी यांच्यातील दोन हजार रुपयांपर्यंतचे युपीआय व्यवहार तसंच लहान व्यापाऱ्यांसाठी 'शून्य मर्चंट डिस्काउंट रेट' म्हणजेच एमडीआर आराखड्यांतर्गत येणारे व्यवहारही निःशुल्क असतील,असा खुलासाही अर्थ मंत्रालयानं केला आहे. या निर्णयामुळे व्यक्ती-ते व्यापारी म्हणजेच पीटूएम व्यवहारांपैकी सुमारे 96 टक्के व्यवहारांवर कोणताही परिणाम होणार नाही. एमडीआर फक्त दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या विशिष्ट व्यापारी व्यवहारांना लागू होईल, असंही अर्थ मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. हा बदल येत्या 15 ऑक्टोबरपासून लागू होणार आहे. दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या व्यक्ती-ते-व्यापारी व्यवहारांवर 4 दशांश टक्के इतकं नाममात्र एमडीआर आकारलं जाईल, तर 75 हजार रुपये आणि त्याहून अधिक रकमेच्या व्यवहारांसाठी एमडीआरची मर्यादा प्रति व्यवहार 300 रुपये निश्चित करण्यात आली आहे. तर युपीआय व्यवहारांसाठी व्यापारीवर्गाकडून ग्राहकांवर एमडीआर शुल्काचा भार टाकला जाणार नाही याची काळजी घेण्याबाबत बँकांना सूचना देण्यात आल्याचंही अर्थ मंत्रालयानं सांगितलं आहे. दरम्यान, एमडीआर संकलनाच्या 5 टक्के रकमेचं योगदान देऊन लहान व्यापाऱ्यांकडून युपीआयचा वापर वाढवण्यासाठी एक विशेष निधी उभारला जाईल,असं सांगण्यात आलं आहे.

### ब्रिक्स-अपडेट

नवी दिल्लीत नुकत्याच झालेल्या 18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात झालेल्या चर्चेत अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. या भेटीत पंतप्रधानांनी भारताला वाटणारे चिंतेचे विषय मांडले. या मुद्दयांचा विचार करताना 'परस्पर आदर, हित आणि संवेदनशीलता' या तीन तत्त्वांचं पालन केलं जावं अशी अपेक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

ओमानच्या किनाऱ्याजवळील प्रदेशात व्यापारी जहाजे, खलाशी, नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे भारताला मान्य नसल्याचं जयस्वाल यांनी सांगितलं. या भागात व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. या भागातील आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरून होणारी मुक्त आणि सुरक्षित वाहतूक तसंच व्यापार लवकरात लवकर पूर्ववत होण्याची गरज भारतानं व्यक्त केली असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**पुस्तक प्रकाशन**

उपराष्ट्पती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते काल, तेलंगणचे माजी राज्यपाल डॉक्टर तमिलिसाई सुंदरराजन लिखित 'अ सेन्च्युरी ऑफ सर्विस-द आरएसएस इन हंड्रेड अ‍ॅक्ट ऑफ सेवा' या पुस्तकाचं काल दिल्लीत प्रकाशन करण्यात आलं. हे पुस्तक म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकभराच्या सेवा, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रनिर्माणातील योगदानाचं दस्तऐवजीकरण असल्याचं उपराष्ट्रपतींनी यावेळी नमूद केलं. कोविड काळातल्या संघ स्वयंसेवकांच्या मदतकार्याचं स्मरण यावेळी राधाकृष्णन यांनी केलं.

**यमुना प्रकल्प**

यमुना नदीच्या पुनरूज्जीवनासाठी किशाऊ बहुउद्देशीय धरण प्रकल्पाच्या करारावर काल सहा राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली. यामध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, राजस्थान आणि दिल्ली यांचा समावेश आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केलेला हा प्रकल्प ऐतिहासिक अध्याय ठरणार असल्याचं शहा यावेळी म्हणाले. या प्रकल्पाचा 90 टक्के आर्थिक भार केंद्र सरकार उचलणार असून राज्यांना केवळ 10 टक्केच गुंतवणूक करावी लागणार आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

**निर्यात वाढ**

ऑगस्ट महिन्यात, पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यातीतल्या वाढीमुळे देशाच्या वस्तू निर्यातीत 26 पूर्णांक 12 शतांश टक्क्यांची मोठी वाढ नोंदवली गेली. ही निर्यात 43 पूर्णांक 81 अब्ज अमेरिकेन डॉलर्सवर पोहोचली आहे. त्याचवेळी सोन्याच्या आयातीत घट झाल्यामुळे व्यापार तूट कमी होऊन ती 26 पूर्णांक 86 अब्ज अमेरिकेन डॉलर्सवर पोहोचली. ही गेल्या पाच महिन्यांतील नीचांकी पातळीवरील तूट आहे.

**जहाज बांधणी केंद्र-उभारणी**

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातल्या दिघी इथं देशातील सर्वात मोठं जहाजबांधणी केंद्र उभ राहणार आहे. यासाठी नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लिमिटेड आणि माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आल्याची माहीती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते काल मंत्रालयात माध्यमांशी बोलत होते. एकंदर 27 हजार कोटी रुपयांची ही गुंतवणुक असून ,या प्रकल्पातून 15 हजार लोकाना प्रत्यक्ष आणि 75 हजार लोकाना अप्रत्यक्ष असे 90 हजार रोजगार निर्माण होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**'महाखनिज दोन'-ॲप**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मंत्रालयात महसूल विभागाच्या 'महाखनिज दोन' या प्रणाली आणि मोबाईल ॲपचं लोकार्पण तसंच राज्य महाखनिज नियंत्रण कक्षाचं उद्‌घाटन केलं. महाखनिज दोन, या प्रणालीतल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे गौण खनिज क्षेत्राचं सर्वेक्षण, वाहतुकीवर देखरेख आणि परवान्यांची डिजिटल पडताळणी अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. याशिवाय, अनियमितता ओळखणं आणि महसुलातील तफावत आणि गळती कमी करण्यासाठीही ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे.

**ओझोन दिन**

जगभरात आज 'जागतिक ओझोन दिन' साजरा केला जात आहे. पृथ्वीवरील सजीवसृष्टीचं संरक्षण करण्यात ओझोनच्या थराची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. त्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस समर्पित आहे. 'शीत पृथ्वीसाठी जागतिक कृती' ही या दिवसाची यावर्षीची संकल्पना आहे.

**भारत अमेरिका सराव**

भारत आणि अमेरिकेच्या लष्करी तुकड्यांचा समावेश असलेला युद्ध अभ्यास या संयुक्त लष्करी सरावाला कालपासून सुरुवात झाली. या सरावाचा उद्देश दोन्ही देशांच्या दलांमधील परस्पर कार्यक्षमता वृद्धिंगत करणे, उदयोन्मुख आव्हानांचा सामना करणे आणि द्विपक्षीय संरक्षण भागीदारी अधिक दृढ करणे, असा आहे. सरावाच्या २२ व्या आवृत्तीचं उद्घाटन उत्तराखंडच्या औली फॉरेन ट्रेनिंग नोड इथं पार पडला. हा सराव एकाच वेळी औली आणि राजस्थानमधील महाजन फील्ड फायरिंग रेंज इथं होणार आहे.

**नेपाळ मृत्यू**

नेपाळमधील पुरात  मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 1 हजार 399 वर पोहोचली आहे. सुरक्षा दलांचं संयुक्त पथक शोध आणि बचाव कार्य करत असून, बेपत्ता लोकांची संख्या सुमारे 5 हजार 170 असल्याचा अंदाज आहे. आतापर्यंत एकंदर 13 हजार 742 लोकांची सुटका करण्यात आली आहे अशी माहिती नेपाळच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. 26 ऑगस्ट रोजी नेपाळ-तिबेट सीमेजवळ आलेल्या पुराचा उत्तर आणि मध्य नेपाळमधील शहरं आणि गावांना मोठा फटका बसला आहे.

**क्रिकेट**

दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर भारत आणि अफगाणिस्थान यांच्यात सुरू असलेल्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं अफगाणिस्तानचा सात गडी राखून पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. 160 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने 14 षटकं आणि 5 चेंडूत 3 बाद 163 धावा करत सहज विजय मिळवला. संजू सॅमसनने 22 चेंडूत 57 धावांची धडाकेबाज खेळी करत सर्वाधिक धावा केल्या. तत्पूर्वी, अफगाणिस्तानचा कर्णधार इब्राहिम झद्रानने 33 चेंडूत 37 धावा केल्या. भारताकडून नितीश कुमार रेड्डीनं 3, तर अर्शदीप सिंगनं 2 बळी घेतले. नितीश कुमार रेड्डीला सामनावीर घोषित करण्यात आलं. या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना आज दिल्लीतील याच मैदानावर होणार आहे.

**हवामान**

हवामान विभागानं आज अंदमान आणि निकोबार बेटं, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीमध्ये  मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. देशातील इतर अनेक राज्यातही अशाच प्रकारचं हवामान राहणार आहे. बिहार, जम्मू-काश्मीर, लडाख, झारखंड, ओडिशा आणि राजस्थानमध्ये पुढील दोन दिवस वादळी वारे आणि विजांसह पावसाची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.